ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

# मराठी समाजशास्त्र परिषद

**(नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र/२७–८३ औरंगाबाद)**

—: कार्यालय पत्ता :—

समाजशास्त्र विभाग,

महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

—: कार्यकारी मंडळ :—

अध्यक्ष : डॉ. सरोज आगलावे रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सचिव : डॉ. दिपक पवार रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

खजिनदार : डॉ. राहुल भगत रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सदस्य : प्रा. साहेबराव भालेराव स्वा. रा. ति. म. विद्यापीठ, नांदेड.

सदस्य : डॉ. ज्योती पोटे मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सदस्य : डॉ. भरतसिंग पटले एस.एन.डी. टी. विद्यापीठ,मुंबई.

सदस्य : डॉ. चुडामन पगारे क. ब. चौ. उ. म. विद्यापीठ, जळगाव.

सदस्य : डॉ. सतीश देसाई शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य : प्रा. नंदकिशोर राऊत सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती

सदस्य : डॉ. विकास शेवाळे क्रा. सा. फुले पुणे विद्यापीठ, पुणे

सदस्य : डॉ. अशोक सालोडकर गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सदस्य : प्रा. प्रवीण घोडेस्वार य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक

सदस्य : डॉ. हनुमंत मिसाळ डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

सदस्य : डॉ. रामेश्वर मोरे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ३६ वे | अंक २३ वा | डिसेंबर, २०१८

**समकक्ष समिक्षा समिती** (Peer Review Committee)

डॉ. श्रुती तांबे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

डॉ. जगन कराडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डॉ. बालाजी केंद्रे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. धनराज पाटील, समाजशास्त्र विभाग प्रमुख, सोलापूर विद्यापीठ

डॉ. अ. रहीम अ. मुजीब, सोशल महाविद्यालय, सिध्देश्वर पेठ, सोलापूर.

डॉ. जयश्री महाजन, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव.

डॉ. एन. टी. कांबळे, अध्यक्ष, समाजशास्त्र अभ्यास मंडळ, स्वा. रा. तिर्थ विद्यापीठ, नांदेड.

डॉ. स्मृती भोसले, एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई.

डॉ. संपत काळे, टाटा समाजविज्ञान संस्था, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

डॉ. संदीप चौधरी, स. भु. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद.

डॉ. संजय सावळे, के. टी. एच. एम. महाविद्यालय, गंगारपूर रोड, नाशिक.

प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना. औरंगाबाद

डॉ. प्रदीप मेश्राम, समाजशास्त्र विभाग प्रमुख, जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा.

डॉ. रंजना लाड, समाजशास्त्र विभाग प्रमुख, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर.

डॉ. रविंद्र वाघ, समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालय, धुळे.

डॉ. कल्याण साखरकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, फु. ना. महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ.

डॉ. धनंयज सोनटक्के, प्रियदर्शनी महाविद्यालय, वर्धा (रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर)

डॉ. दिनकर उंबरकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, सिताबाई कला महाविद्यालय, अकोला.

डॉ. मिलिंद जांभूळकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख, जनता महाविद्यालय, चंद्रपूर.

डॉ. राजेन्द्र कांबळे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, इंदीरा गांधी महाविद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शिर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | अल्पसंख्याकांची अस्मिता: तात्वीक भ्रम आणि व्यावहारिक संदर्भ | जगन कराडे | ...१ |
| २. | नैसर्गिक संसाधन आणि सामाजिक न्याय... | संपत काळे | ...६ |
| ३. | उत्तर जागतिकीकरणातील उपेक्षीतांचे संघटनीकरण | धनराज पाटील | ...११ |
| ४. | सायबर स्त्रीवाद | प्रविण घोडेस्वार | ...१६ |
| ५. | आदिवासी समाज व कुमारीमातांची समस्या | श्रीराम खाडे | ...१९ |
| ६. | शासनाचे विनाअनुदान धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षण | हनुमंत मिसाळ | ...२४ |
| ७. | महिला सक्षमीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | ज्योती पोटे | ...२८ |
| ८. | देवदासी प्रथा: एक समाजशास्त्रीय चिंतन | जया लाडे | ...३१ |
| ९. | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग | प्रविण मुधोळकर | ...३६ |
| १०. | भटक्या विमुक्त समाजातील वर्तमान समस्या व परिवर्तन | दिपक पवार | ...४१ |
| ११. | जागतिक तापमान वाढीचे संभाव्य धोके व उपाययोजना | बाळकृष्ण रामटेके | ...४४ |
| १२. | बचत गटाच्या संकल्पनेतील महिला सशक्तीकरण | गणेश बहादे | ...४७ |
| १३. | समाजशास्त्र : समस्या व आव्हाने | कमलकिशोर इंगोले | ...४९ |
| १४. | जागतिकीकरणाचा आदिवासी समाज जीवनावरील परिणाम | मनोहर येरकलवार | ...५२ |
| १५. | सेझ जमीन अधिग्रहण विरोधी शेतकऱ्यांचा संघर्ष | मंजुषा नळगीरकर | ...५६ |
| १६. | जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांची धार्मिक स्थिती | राजेंद्र बगाटे | ...६१ |
| १७. | भारतीय राज्यघटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | के. एस. काळे | ...६७ |
| १८. | महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण : एक काळाची गरज | सुरेश धनवडे | ...७१ |
| १९. | सरोगसी माता | विलास पवार | ...७४ |
| २०. | महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची गती आणि स्थिती | नारायण कांबळे | ...७७ |
| २१. | आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना भेडसावणाऱ्या समस्या | रामेश्वर मोरे | ...८३ |
| २२. | सुशिक्षित बेरोजगारी आणि गुन्हेगारी | किशोर राऊत | ...८५ |
| २३. | महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे बदलते विविध पैलू | सुधा खडके | ...८८ |
| २४. | प्रसार माध्यम आणि ग्रामीण युवकांचे वर्तन | एस. के. राठोड | ...९१ |
| २५. | महिला सबलीकरण | हर्षला सुर्यवंशी | ...९६ |
| २६. | लिंगभाव विषमता : माता, बाल कुपोषण | भगवान मनाळ | ...९८ |
| २७. | लोकसंख्या विस्फोट : एक सामाजिक समस्या | अशोक सालोटकर | ...१०२ |
| २८. | जेष्ठांच्या समस्या व जेष्ठ नागरिक चळवळीची भूमीका | रविंद्र विखार | ...१०४ |
| २९. | काव्यसृष्टीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचे योगदान | संतोष मेंडेंकर | ...१०६ |
| ३०. | शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीवरील प्रभाव | श्रीनिवास पिलगुलवार | ...१०८ |
| ३१. | जातीभेदाचे मूलगामी चिंतन (ग्रंथ समिक्षण) | प्रियदर्शन भवरे | ...११४ |
| ३२. | २८ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल | अरूण पौडमल | ...११८ |

# सायबर स्त्रीवाद

प्रा. प्रवीण घोडेस्वार, समाजशास्त्र विभाग, य. च. म. मु. वि. नाशिक मो. ९८०३७७८०३०

साहित्यामध्ये 'स्त्रीवाद' आणि 'स्त्री प्रश्न' यांची मांडणी करणारे लेखन जवळपास सर्वच भारतीय भाषांमध्ये होतांना दिसून येत आहे. मध्याच्या काळात स्त्रीवादी साहित्याला नवे परिमाण लाभत आहे. स्त्रीवादी साहित्याचे उपयोजन, आकलन, समीक्षण, मूल्यमापन यावरही सातत्याने चर्चा होत आहे. मात्र असे असले तरीही समाजात आणि साहित्यातही स्त्रियांची परिस्थिती उन्नत होताना मात्र दिसत नाहीये. स्त्री प्रश्नांची मांडणी केवळ औपचारिकता म्हणून न करणारी, वादविवादाचे मोहोळ न उठवणारी आणि अंमलबजावणीचा आग्रह धरणारी एक विचारधारा म्हणजे सायबर स्त्रीवाद, असे ढोबळमानाने सांगता येते.

जगातल्या कोणत्याही काना–कोपऱ्यातल्या स्त्री चा आवाज दुसऱ्या कोपऱ्यात पोहचवण्याचे कार्य सायबर स्त्रीवाद करत आहे. त्यासाठी स्त्रियांना एकत्रित आणत आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवर सहाय्यभूत ठरत आहे. मग आर्थिक गरज असो वा सामाजिक न्यायासाठीचा लढा अथवा एड्सग्रस्त स्त्रियांना मानसिक आधार देण्याचा मुद्दा असो, सायबर स्त्रीवादाचा विस्तार विश्वव्यापी आहे.

मुळात स्त्रीवाद या संकल्पनेबाबत अनेक समज–गैरसमज अस्तित्वात आहेत. साहजिकच सायबर स्त्रीवाद ही संकल्पना सुद्धा समजून न घेता याचा विपर्यास होण्याची दाट शक्यता आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानता प्रस्थापित होण्यासाठी उभी राहिलेली चळवळ म्हणजे स्त्रीवाद अशी शब्दकोशातल्या अर्थानुसार स्त्रीवाद ह्या संकल्पनेचा अर्थ सांगितला जातो. या मध्ये Black feminism, मार्क्सवादी स्त्रीवाद, दलित स्त्रीवाद या सारखे प्रवाह दिसून येतात. पुरुषांचा द्वेष करणाऱ्या आणि मुक्तपणे जगू पाहणाऱ्या स्त्रिया असा एक गैरसमज भारतात sisterhood या स्त्रीवादाबाबत रूढ झालेला आहे. आधुनिक मुली/स्त्रिया यांनी थेट, बेधडक, कोणताही आडपडदा न ठेवता केलेले ब्लॉग लेखन आणि त्यांची मौज–मस्ती यालाच सायबर स्त्रीवाद समजण्याची चूक भारतीय पुरुष आणि स्त्रिया दोघेही डोळे झाकून करतात. वास्तविक हा विषय गांभीर्याने चर्चा करण्याचा आहे. जेव्हा आपण online असतो आणि आपली इमेल पाहतो, आपल्या आवडत्या वेबसाईटला भेट देतो त्यावेळी आपल्याला हे विसरता येत नाही की आपण आपल्या जीवनावर परिणाम करणाऱ्या एका सामाजिक बदलांमध्ये सहभागी होत आहोत. आपले दैनंदिन जगणे सुसह्य केल्याबद्दल आपण इंटरनेटचे आभार मानून कौतुक करत असतो. आपण नेट च्या माध्यमातून खरेदी करतो, दूरदेशातल्या आपल्या नातेवाईक, मित्र परिवाराशी संपर्क साधतो तसेच आपल्याला हवी असलेली प्रत्येक माहिती घरबसल्या प्राप्त करत असतो.

एव्हाना आपल्याला इंटरनेट च्या अफाट क्षमतेचा परिचय झालेला आहे. या क्षमतेचा सामाजिक परिवर्तनासाठी कसा उपयोग करून घेता येईल यासाठी जगभरातल्या जागरूक स्त्रिया प्रयत्नशील व कार्यरत आहेत. केवळ स्त्री स्वातंत्र्यासाठीच नाही तर इतरही अनेक क्षेत्रात आणि संदर्भांसाठी स्त्रिया इंटरनेट च्या माध्यमातून एकत्रित होत आहेत. अधिकाधिक स्त्रियांना इंटरनेटचा वापर करता यावा, त्यांच्या क्षमतांना योग्य वाव मिळावा, त्यांच्या सीमांचा विस्तार होण्यासाठी इंटरनेट स्त्रीयांसाठी नेमके friendly माध्यम आहे. यावरून कोणत्याही संगणक किंवा स्मार्ट फोन साक्षर स्त्री ला आवश्यक असलेली माहिती सहजपणे प्राप्त करून घेता येते. अलीकडे स्मार्ट फोन वरून इंटरनेट चा वापर करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत वाढ होत आहे. स्त्रियांशी निगडीत निरनिराळ्या विषयांच्या वेबसाईटस च्या हायपर लिंक च्या सहाय्याने स्त्रिया माहिती प्राप्त करून घेत आहेत. यामध्ये आरोग्यविषयक, कायदेविषयक, व्यक्तिमत्व विकास विषयक, पाककला विषयक माहितीचा समावेश असून वेब सिरीज, टीव्ही मालिका यातून मनोरंजनही करून घेत आहेत. याशिवाय शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, रोजगार संधी, अत्याचारित स्त्रियांसाठी काम करणाऱ्या शासकीय तथा NGOs यांचीही माहिती स्त्रिया मिळवत असतात.

इंटरनेटवर स्त्री प्रश्नांची चर्चा करणारे फोरम निर्माण झाले आहेत. केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही असे फोरम तयार होऊन त्यात भारतीय स्त्रियादेखील वैचारिक आदान–प्रदानात सहभागी होत आहेत. Global Sisterhood कडे जाण्याच्या दिशेने जगातल्या बायकांचे प्रयत्न सुरु आहेत. इंटरनेट ची सहज उपलब्धता आणि वापरण्याची सुलभता याचाच हा परिपाक आहे. स्वतःला व्यक्त करणे, आपले दुःख इतरांसमवेत शेअर करणे, आपसात बातचीत करणे यासाठी स्त्रिया विविध सोशल मिडिया चा उपयोग सकारात्मक पद्धतीने करताना दिसत आहेत. जगात सायबर विश्वातली स्त्रियांसाठी निर्माण झालेली पहिली